DAY — **15** SEAT NUMBER | | | | | | |

2025	III	03	1500	**J-366**	(M)

PHILOSOPHY (46)

Time : 3 Hrs. **(4 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(३) प्रत्येक नवीन प्रश्नाचा प्रारंभ नवीन पानावर करावा.

प्र. १. (अ) कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा : (६) **[२०]**

(१) ----- सत्यता सिद्धांतानुसार ज्या विधानाच्या आधारे केलेली कृती यशस्वी होते ते विधान सत्य असते.
[अनुरूपता, फलप्रामाण्यवादी, सुसंवाद]

(२) बौद्ध दर्शनाच्या मते ----- हा सत्‌चा आवश्यक गुणधर्म आहे.
[शुद्धत्व, अनित्यता, नित्यता]

(३) ----- च्या मते कलाकृती ही अनुकृती आहे.
[प्लेटो, क्रोशे, टॉलस्टॉय]

(४) इतर जीवांमध्ये देखील माणसाप्रमाणेच चैतन्य आहे असे मानणे हा ----- विचार आहे.
[मनुष्यकेंद्री, जीवकेंद्री, निसर्गकेंद्री]

(५) ----- परंपरेत योग्य श्रद्धा, योग्य ज्ञान आणि योग्य आचरण यांना त्रिरत्न म्हणून ओळखले जाते.
[बौद्ध, चार्वाक, जैन]

(६) ----- यांना आधुनिक तत्त्वज्ञानाचे जनक म्हटले जाते.
[स्पिनोझा, रेने देकार्त, हेगेल]

(ब) गटातील वेगळा शब्द / जोडी ओळखून लिहा : (४)

(१) कचरा, प्रदूषण, वनस्पती, राख

(२) स्पिनोझा, देकार्त, बर्कले, लाईब्निझ

(३) चार्वाक, जैन, अद्वैत वेदांत, बौद्ध

(४) जडवाद, वास्तववाद, असत्कार्यवाद, चिद्वाद

(क) खालील संकल्पना चित्र / तक्ता / ओघतक्ता पूर्ण करा : (६)

(१)



(२)



(ड) खाली दिलेल्या विधानांसाठी वापरण्यात येणाऱ्या तत्त्वज्ञानातील संज्ञा लिहा : (४)

(१) संपूर्ण विश्वाला एकत्र धरून ठेवणारे तत्त्व –

(२) ज्ञानेंद्रिय आणि वस्तू यांच्या संपर्कातून होणारे निश्चित दोषमुक्त आणि सत्यज्ञान.

(३) ''चैतन्यविशिष्ट देह एवं आत्मा'' या चार्वाकाच्या भूमिकेसाठी वापरण्यात येणारी संज्ञा.

(४) ज्या कलेमध्ये निर्मिती करण्यामागचा हेतू उपयुक्त नसून आस्वाद आहे अशी कला.

प्र. २. खालील प्रश्नांची २० ते २५ शब्दांत उत्तरे लिहा (कोणतेही पाच) : **[१०]**

(१) सूक्ष्म कणांमुळे विश्वात कोणती बले उद्‌भवतात?

(२) प्लेटोच्या मते शरीरात बद्‌ध असलेल्या आत्म्याचे भाग कोणते आहेत?

(३) 'अर्थ' पुरुषार्थ म्हणजे काय?

(४) तंत्रज्ञान म्हणजे काय?

(५) 'अनुमान' म्हणजे काय?

(६) आरंभवाद म्हणजे काय?

(७) कलेचे मुख्य घटक सांगा.

प्र. ३. टिपा लिहा (कोणत्याही तीन) : **[९]**

(१) 'मोक्ष' पुरुषार्थ

(२) कला प्रकार

(३) 'एन्टिलेची'

(४) रेने देकार्तची 'स्व' (आत्मा) विषयीची कल्पना

(५) जैनांची पंचव्रते

प्र. ४. (अ) फरक स्पष्ट करा (कोणतेही दोन) : (६) **[१६]**

(१) सौंदर्यवादी दृष्टिकोन आणि ज्ञानकेंद्री दृष्टिकोन

(२) सत्कार्यवाद आणि असत्कार्यवाद

(३) जैनांचा 'स्व' विषयक दृष्टिकोन व अद्‌वैतवेदांत 'स्व' विषयक दृष्टिकोन

(४) सत्यतेचा अनुरूपता सिद्‌धांत आणि सत्यतेचा सुसंवाद सिद्‌धांत

(ब) खालील विधाने 'सत्य' की 'असत्य' ते सकारण सांगा (कोणतेही पाच) : (१०)

(१) बौद्ध दर्शनाने निष्काम कर्म करण्याच्या मार्गाचे प्रतिपादन केले आहे.

(२) ॲरिस्टॉटलेच्या मते फक्त विशिष्टाचे जगच अस्तित्वात आहे.

(३) 'सजणे/सजवणे' ही कृती फक्त माणसांपुरती मर्यादित नाही.

(४) बेन्थॅमने सुखवादी कलन तयार केले

(५) ह्यूमच्या मते कार्यकारण संबंधात अनिवार्यता असते.

(६) पारमेनिडिसच्या मते सत् परिवर्तनशील आहे.

(७) व्यक्तिनिष्ठता हा वैज्ञानिक ज्ञानाचा गुणधर्म आहे.

प्र. ५. खालील संकल्पनांचे / विधानांचे उदाहरणासहित ८० ते १०० शब्दांत स्पष्टीकरण करा. (कोणतेही दोन) : **[१०]**

(१) पंचस्कंध

(२) ऋण संकल्पना

(३) ॲरिस्टॉटलचा चतुर्विध कारणता सिद्धांत

प्र. ६. खालील तात्त्विक संकल्पना / समस्या / प्रसंग यांना उद्देशून संवाद लिहा (कोणताही एक) : **[५]**

(१) चांगले जीवन जगण्यासाठी तंत्रज्ञानाचे होणारे फायदे व त्याचा दुष्परिणाम सांगणारा दोन विद्यार्थ्यांमधील संवाद.

(२) भारतीय कलेविषयी कलाकार आणि रसिक यांच्यातील संवाद.

प्र. ७. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर १५० ते २०० शब्दांत लिहा : **[१०]**

(१) जॉन लॉकचा अनुभववाद सविस्तर स्पष्ट करा.

(२) चार्वाक आणि सांख्य दर्शनातील सत् विषयीचे विचार सविस्तर स्पष्ट करा.

◆◆◆